# रे.मु.नं.४७/२०१९ मध्ये नि. क्र.२७ वर आदेश.

**भिकु सुदाम शिलकर–३ वि. रविंद्र भिकु शिलकर–१.**
**(सीएनआर क्र.MHRG**–13000–386–2019)

०१. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.२ यांना दिनांक १२/०३/२०२० रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झाली. परंतु प्रतिवादी यांनी विहीत मुदतीत कैफियत दाखल न केल्याने दिनांक १५/०२/२०२१ रोजी त्यांनी मुदतीचा अर्ज दिला असता लेखी जबाबा विना प्रकरण चालविण्याबाबतचा आदेश करण्यात आला. सदर आदेश रद्दबातल होवून प्रतिवादी यांना झालेला २८१ दिवसांचा विलंब माफ करुन त्यांची कैफियत फैलावर घेण्याकरीता सदरचा विनंती अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.२ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दाव्या कामी प्रतिवादी यांना काही महत्वाची कागदपत्रे प्राप्त न झाल्याने व दरम्यानचे काळात कोरोना महामारीमुळे संचारबंदी लागू झाल्याने प्रतिवादी क्र.२ यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नसल्याचे कथन केले आहे. तसेच संचारबंदी उठल्यानंतर दिनांक ०५/०१/२०२१ रोजी त्यांनी सदरचे कामकाज पाहण्यासाठी वकील नेमले. सदर प्रतिवादी यांनी त्यांची सदर दाव्यात कैफियत दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादींचे अपरिमित असे नुकसान होणार असल्याचे कथन करुन त्यांची न्याय बाजु मा. न्यायालयासमोर येणार नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे त्यांना

त्यांचे न्याय हक्कास मुकावे लागले. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांचे विरुध्द लेखी जबाबा विना प्रकरण चालविण्याबाबतचा आदेश रद्द करुन २८१ दिवसांचा विलंब माफ करुन कैफियत दाखल करुन घेण्यात यावी अशी विनंती सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.२ यांनी केली आहे.

०३. सदर अर्जावर वादी यांनी अर्जास हरकत असल्याचे कथन करुन अन्य कोणताही मुद्दा उपस्थित केलेला नाही.

०४. सदर प्रकरणातील दोन्हीं वकीलांचे युक्तीवाद ऐकले. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर प्रकरणात न्यायालयाचे नियमित कामकाज दिनांक ०१/०२/२०२१ रोजी सुरु झाले असून मार्च २०२० ते फेब्रुवारी २०२१ हा कालावधी कोरोना महामारीच्या काळातील असल्याने झालेला विलंब माफ करणे योग्य होईल. सदर प्रकरणातील पक्षकारांमध्ये वादाचे कायम स्वरुपी निराकरण होण्यासाठी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी यांना पुर्ण संधी देणे न्यायोचित होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र.२ यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

रे.मु.नं.४७/२०१९.
नि.क्र.२७.

:: **आदेश** ::

०१. नि.क्र.२७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. येणे प्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

श्रीवर्धन. ( प्र. ग. लंबे )
दिनांक : १८/०३/२०२१. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, श्रीवर्धन.

Pratik Ganesh Lambe

Digitally signed by Pratik Ganesh Lambe
Date: 2021.03.20 14:41:42 +0530